
# अमीन सयानी - भाग १




गेल्या ५० वर्षांहून जास्त अशा कालखंडात अमीन सयानी यांनी दिलेल्या प्रचंड योगदानामुळे आणि त्यातीलहि काही अपवादात्मक उत्कृष्ट कामगिरीमुळे तुम्ही थक्कच व्हाल ! कारण असे की त्यांनी आकाशवाणीसाठी जवळजवळ ५५ हजार कार्यक्रमांची निर्मिती केली, त्यांचे सूत्रसंचालन केले, (काही वेळा तर स्वत:ची योग्य ती मते मांडून त्यातून श्रोत्यांशी संवादही साधला) तसेच जाहिरातीसाठी किमान २०,००० छोटी तालगीते (जिंगल्स) सुध्दा सादर केली.

त्यांनी दूरदर्शनसाठी ८ टी.व्ही. शोज चे सूत्रसंचालन केले. आकाशवाणी आणि दूरदर्शनशी संलग्न असलेल्या जाहिरातीसंबंधीच्या बऱ्याच कार्यशाळा आणि परिसंवाद यांत भाग घेतला. तसेच भारतात आणि परदेशातही त्यांनी जवळ जवळ २००० स्टेज शोज चे सूत्रसंचालन केले. याहूनही बरेच काही भरीव कार्य केलं. त्यांनी सादर केलेल्या या महान कामासाठी खरे तर त्यांचे नाव 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये समाविष्ट व्हायला हवे. इतकेच नाही तर 'न भूतो न भविष्यति' अशा या कार्यमग्न असामीवर कुणीतरी पुस्तकच लिहायला हवे. निदान स्वत: अमीन साहेबांनी आपल्या स्मरणीय आठवणींचे एक पुस्तक तरी प्रकाशित करायला हवे असे तुम्हाला नाही का वाटत? तुम्ही त्यांना जर असं सुचवून पाहिलंत तर त्यांवर ते पटकन म्हणतील, "हो, पण वेळ कुठे आहे? माझा पुढचा शो आणि काही जिंगल्स पूर्ण करण्यासाठी माझ्यासमोर वेळेचं बंधन आहे आणि ते पाळण्यातच माझं सारं आयुष्य चाललंय."

अशा या विस्मयचकित करणाऱ्या गृहस्थाने ५०, ६०, ७०, ८० आणि ९०च्या दशकांत आकाशवाणीवर 'बिनाका गीत माला' हा अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाचं नाव एकदा 'सिबाका गीतमाला' आणि नंतर 'कोलगेट सिबाका गीतमाला' असे दोन वेळा बदलूनही त्यातल्या लोकप्रियतेत काहीही कमतरता आली नाही. पहिल्या दहा वर्षांत तर आपण सगळे दर बुधवारी एका अनामिक ओढीने रेडिओकडे खेचले जात असू. साध्या हार्मोनियम वादनावर बंदी आणणाऱ्या ऑल इंडिया रेडिओने वरील कार्यक्रम धुडकावून लावल्यामुळे तो रेडिओ सिलोन  वरून सुरू करण्यात आला होता. जवळ जवळ सगळे देशवासीय ह्या कार्यक्रमासाठी बुधवार रात्रीची आतुरतेने वाट पहात असत. इतकेच नाही तर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान आणि आफ्रिकेतील बऱ्याच भागांतील रसिक श्रोतेही हा कार्यक्रम आवडीने ऐकत असत. अमीन सयानी यांचा सुंदर, भारदस्त आवाज, 'बेहनो और भाईयो' अशी भावपूर्ण साद सुरुवातीला आणि अधून मधून कार्यक्रमाच्या दरम्यानही देत श्रोत्यांशी अघळपघळ बोलता बोलता त्यांच्याशी साधलेली आत्यंतिक जवळीक, गाण्यांचे भावमधुर सादरीकरण - हा सर्व, आठवड्याचा एक अतिसुंदर अनुभव होता. तो वर्णन करण्यास शब्दच तोकडे पडतील. सुरुवातीच्या काळात त्या त्या आठवड्यात वाजविली जाणारी गाणी, लोकप्रियतेच्या अनुषंगाने क्रमवारी लावण्यासाठी रसिक श्रोत्यांनीही सहभाग घ्यावा अशी विनंती करण्यात आली होती. अमीन सयानी यांच्या साशंक अंदाजानुसार साधारणपणे श्रोत्यांची ४०/५० पत्रेच आठवड्याला येतील असे त्यांना वाटले. परंतु त्यापेक्षा कितीतरी जास्त पटींनी पत्रे येऊ लागली आणि ६ महिन्यांतच दर आठवड्याला जवळजवळ ६०,००० असा पत्रांचा जणू पाऊस पडू लागला.

हा कार्यक्रम मजल दरमजल करीत जोरात सुरुच राहिला. पण अखेर श्रीलंकेबरोबरच्या करारानुसार तो १९८९ मध्ये सिलोन रेडिओवरून बंद करावा लागला. परंतु ऑल इंडिया रेडिओवरून तो अगोदरच प्रसारित करण्यात येत होता. १९९३ पर्यंत तो तसाच चालू होता. त्यानंतर मात्र १९९८ पर्यंत स्थगित करण्यात आला. त्यानंतर तो अगदी आत्ता आत्तापर्यंत चालू होता, पण लहरी शासनाच्या ८% सेवा कराच्या कडक निर्णयामुळे तो बंद करण्यात आला. काही असो, पण या कार्यक्रमाची 'दीर्घकाळ चालण्याचा उच्चांक गाठलेला एक लोकप्रिय कार्यक्रम' अशीच रसिक दरबारी नोंद होईल.

ज्या अवलिया गृहस्थाने आपल्या गाण्यांच्या रुपातून असा दीर्घकाल अपार आनंद दिला तो कोण आहे ते जाणून घ्यायला हवे ना ?

अमीन सयानी हे जन्माने कच्छी होते. त्यांचे पूर्वज बलसाडला स्थायिक झालेले होते. अमीन यांना हबीब आणि हमीद असे दोन भाऊ होते. दोहोंतील पहिला इंग्लंडला गेला आणि त्याचा कुटुंबाशी काही संपर्क राहिला नाही. अमीन यांच्या आईला वाचनाची/साहित्याची आवड होती. तसेच त्या गांधीजींच्या संपर्कातही होत्या. लोकशिक्षणाच्या दृष्टीने त्यांनी एखादे नियतकालिक चालवावे असा गांधीजींनी

त्यांना सल्ला दिला. तेव्हा त्यांनी 'रेहबर' म्हणजे मार्गदर्शक अशा अर्थाचे एक नियतकालिक चालविण्यास सुरुवात केली. इथे अमीन यांनी प्रथम शिपाई म्हणून आणि त्यानंतर बढती मिळून प्रुफ रीडर म्हणून काम केले आणि अखेर शेवटी त्यांना स्वत:चे लिखाण करण्याची परवानगी मिळाली. हे पाक्षिक त्यांच्या घरातूनच प्रसिद्ध करण्यात येई आणि ते गुजराथी, हिंदी आणि उर्दू अशा तीन भाषांतून निघत आले. इथल्या अनुभवातूनच अमीन यांना लोकांची बोली भाषा जाणून घेता आली. ह्या काळात अमीन महाविद्यालयात शिकत होते.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com